I/1410822/2025-KOPDB-12-DP

Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/डीपी/२०२५/परीक्षा/ 3206
दिनांक:०८/०९/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय: माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळाची प्रथम मान्यता देण्याची प्रक्रिया ऑनलाईन पद्ध्दतीने करणेबाबत..**

संदर्भ: क्र.रा.मं./परीक्षा-३/३०७२ दि.०४/०९/२०२५ चे राज्य मंडळ ,पुणे यांचे प्राप्त पत्र

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य मंडळाच्या संदर्भीय पत्रानुसार सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळाची प्रथम मान्यता देण्याची प्रक्रिया दि.०५/०९/२०२५ पासून मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यात येत आहे.

तरी सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य यांना मंडळाची प्रथम मान्यता देण्याची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करणेबाबत सोबतच्या परिपत्रकांद्वारे निदर्शनास आणून देण्यात येत आहे तरी त्यानुसार यापुढे कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 09-09-2025 16:37:42

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

सोबत- पृष्ठ क्र. १ ते ३
प्रत माहितीस्तव-१) मा.शिक्षण उपसंचालक,कोल्हापूर विभाग,कोल्हापूर
२) मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा–३/ ३०७२
पुणे– ४११ ००४.
दिनांक –०४/०९/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक
व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय –माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळाची प्रथम मान्यता देण्याची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळाची प्रथम मान्यता देण्याची प्रक्रिया दिनांक ०५/०९/२०२५ पासून मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सुरु करण्यात येत आहे.

यासाठी माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाची प्रथम मान्यता घेण्यासाठी संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक/उच्च माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडे प्रचलित पद्धतीने (Offline) प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक/उच्च माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून शिफारस प्राप्त झाल्यानंतर माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरुन विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे Online पद्धतीने प्रस्ताव सादर करावयाचा असून विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने शिफारशीसह Online पद्धतीने प्रस्ताव संबंधित विभागीय मंडळाकडे सादर करावयाचा आहे.

या संदर्भात माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये, विभागीय शिक्षण उपसंचालक व विभागीय मंडळाव्दारे करावयाच्या कार्यवाहीचा तपशील या सोबत जोडलेला आहे. तरी सदर प्रक्रियेबाबत संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना सूचित करणेबाबत उचित कार्यवाही करावी. यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास श्री. वानखेडे, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ याचेशी संपर्क साधावा.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–४.

D.P.
4/9/25

सोबत– पृष्ठ क्र. १ ते ३
प्रत माहितीस्तव – व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग

Kolhapur Divisional Board
Email Received on 04/09/2025
Reg.No. 1923

# प्रथम मान्यतेसाठी
# नवीन शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाने करावयाची कार्यवाही

१. मंडळाची website www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर जाऊन Institute login मध्ये नवीन शाळा / कनिष्ठ महाविद्यालय नोंदणी या link वर click करावे.

२. सदर लिंकवर मुख्याध्यापक / प्राध्यापक यांचा ई-मेल / mobile यांची नोंद करून ते OTP व्दारे validate करण्यात यावे.

३. त्यानंतर login करून शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांची माहिती, संस्थेची माहिती, भौतीक सुविधा माहिती, मान्यताप्राप्त विषय, शिकविणारे शिक्षक यांची माहिती भरण्यात यावी तसेच File Upload मध्ये दिलेल्या यादीमधील सर्व कागदपत्रे Upload करण्यात यावीत. एखादे कागदपत्रे गैरलागू असल्यास निरंक लिहलेले document Upload करण्यात यावे.

४. सर्व यथायोग्य कागदपत्रे Upload करण्याची खातरजमा केल्यानंतर प्रथम मान्यतेसाठी आवश्यक ते शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावे व त्याची receipt प्राप्त करून घ्यावी.

५. शुल्क भरल्यानंतर संबंधित अर्ज व कागदपत्रे 'Send for Approval ' या लिंकवर क्लिक करून शिक्षण उपसंचालक कार्यालयास मान्यतेसाठी ऑनलाईन पद्धतीने पाठवावीत.

६. Registered केलेल्या ई-मेल वर वेळोवेळी Application Progress बाबतची माहिती शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाला उपलब्ध होईल.

# प्रथम मान्यतेसाठी विभागीय मंडळाद्वारे करावयाची कार्यवाही

१. विभागीय मंडळांनी सचिवांच्या लॉगिन मध्ये User Menu द्वारे संबंधित शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या ई-मेल व mobile नोंदवून उपसंचालक कार्यालयाचा login Id तयार करून संबंधित अवगत करावे.

२. शिक्षण उपसंचालक कार्यालयाद्वारे प्राप्त होणारे प्रस्ताव पाहण्यासाठी सचिवांच्या Login मध्ये Profile / Registration या लिंकमधील Manage New School / College या Option वर क्लिक करावे.

३. सदर option द्वारे शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाने भरलेली संपूर्ण माहिती तथा Upload केलेले सर्व कागदपत्रे अवलोकरणार्थ उपलब्ध होतील, त्याचप्रमाणे शिक्षण उपसंचालक कार्यालयाद्वारे Upload केलेले शिफारसपत्र पाहता येईल व Download करता येईल,

४. शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा नवीन मान्यतेचा प्रस्ताव मान्य करावयाचा असल्यास Approve बटनावर क्लिक करून Approval Letter Upload करण्यात यावे, ते OTP द्वारे validate केल्यानंतर शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा नवीन Index Number नोंदविण्यात यावा. सदर Index Number दिल्यानंतर त्याची माहिती ई-मेल द्वारे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाला प्राप्त होईल त्याचप्रमाणे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाला मंडळ कामकाजासाठी आवश्यक User Id व Password ई-मेल द्वारे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाला प्राप्त होईल.

५. शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रस्ताव अमान्य करावयाचा असल्यास Remark या रकान्यामध्ये त्रुटी नमूद करुन Incomplete बटनाद्वारे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडे त्रुटीपूर्ततेसाठी आवेदनपत्र परत पाठविण्यात यावे.

# प्रथम मान्यतेसाठी विभागीय मंडळाद्वारे करावयाची कार्यवाही

१. विभागीय मंडळांनी सचिवांच्या लॉगिन मध्ये User Menu द्वारे संबंधित शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या ई-मेल व mobile नोंदवून उपसंचालक कार्यालयाचा login Id तयार करून संबंधित अवगत करावे.

२. शिक्षण उपसंचालक कार्यालयाद्वारे प्राप्त होणारे प्रस्ताव पाहण्यासाठी सचिवांच्या Login मध्ये Profile / Registration या लिंकमधील Manage New School / College या Option वर क्लिक करावे.

३. सदर option द्वारे शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाने भरलेली संपूर्ण माहिती तथा Upload केलेले सर्व कागदपत्रे अवलोकरणार्थ उपलब्ध होतील, त्याचप्रमाणे शिक्षण उपसंचालक कार्यालयाद्वारे Upload केलेले शिफारसपत्र पाहता येईल व Download करता येईल,

४. शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा नवीन मान्यतेचा प्रस्ताव मान्य करावयाचा असल्यास Approve बटनावर क्लिक करून Approval Letter Upload करण्यात यावे, ते OTP द्वारे validate केल्यानंतर शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा नवीन Index Number नोंदविण्यात यावा. सदर Index Number दिल्यानंतर त्याची माहिती ई-मेल द्वारे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाला प्राप्त होईल त्याचप्रमाणे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाला मंडळ कामकाजासाठी आवश्यक User Id व Password ई-मेल द्वारे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाला प्राप्त होईल.

५. शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रस्ताव अमान्य करावयाचा असल्यास Remark या रकान्यामध्ये त्रुटी नमूद करून Incomplete बटनाद्वारे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडे त्रुटीपूर्ततेसाठी आवेदनपत्र परत पाठविण्यात यावे.